www.rajdand.com
सातारा शुक्रवार
१६. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

राष्ट्रवादी अजितदादांचीच!

नार्वेकरांचा निकाल नेमका काय सांगतो?

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. यावेळी नार्वेकरांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचीच असल्याचं सांगितलं.

काही दिवसांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगानेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव, निवडणूक चिन्ह आणि झेंडा अजित पवारांना दिल्याचा निर्णय दिला होता. त्यानुसारच नार्वेकरांनीही आज निर्णय दिला आहे. तसेच अजित पवारांचे आमदार अपात्र नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. शिवाय शरद पवारांच्या आमदारांना देखील पात्र ठरवण्यात आलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. यावेळी नार्वेकरांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचीच असल्याचं सांगितलं. काही दिवसांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगानेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव, निवडणूक चिन्ह आणि झेंडा अजित पवारांना दिल्याचा निर्णय दिला होता. त्यानुसारच नार्वेकरांनीही आज निर्णय दिला आहे. तसेच अजित पवारांचे आमदार अपात्र नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे. शिवाय शरद पवारांच्या आमदारांना देखील पात्र ठरवण्यात आलं आहे.

मूळ पक्ष अजित पवारांचा

एनसीपी वर्किंग कमिटी ही पक्षाच्या घटनेप्रमाणे सर्वोच्च यंत्रणा आहे. त्यात १६ कायमस्वरूपी सदस्य आहेत. मात्र पक्षाची घटना कायमस्वरूपी सदस्यांना परवानगी देत नाही. नेतृत्व रचना, पक्षीय घटना आणि विधीमंडळ बहुमत पाहून पक्ष कुणाचा हे ठरवावे लागेल. यामध्ये पक्षीय घटना आणि नेतृत्व रचनेत सुस्पष्टता नाही. विधिमंडळ बहुमतावर खरी पार्टी कोणाची हे ठरवता येऊ शकत नाही. प्रत्येक गटाचं बहुमत महत्वाचं आहे. अजित पवारांना ४१ आमदारांचा पाठिंबा होता आणि याच ४१ आमदारांविरोधात शरद पवार गटाने अपात्रता याचिका दखल केली होती. पण, अजित पवार गटाला विधिमंडळाचा पाठिंबा होता आणि आहे. त्यामुळे विधिमंडळ गटाचं पाठबळ पाहता मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवारांचा असल्याचं नार्वेकरांनी सांगितलं.

दोन्ही गटाचे आमदार पात्र

राहुल नार्वेकरांनी आज शरद पवार आणि अजित पवार गट यापैकी कुणाचे आमदार अपात्र केलेले नाहीत. नवनवीन पक्षांसोबत आणि विचारसरणीसोबत हल्ली युती आणि आघाडी होताना आपण पाहतो. पण त्याचा अर्थ प्रत्येक घटनेवर दहाव्या सूचीनुसार कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे राष्ट्रवादीतला हा दोन गटातील पक्षांतर्गत वाद आहे. कुणीही पक्ष सोडलेला नाही त्यामुळे दहाव्या सूचीनुसार कार्यवाही करता येत नाही. असं म्हणत नार्वेकरांनी दोन्ही गटाचे आमदार पात्र ठरवलेत.

शरद पवार विरुद्ध अजित पवार

याविषयी निकाल देताना नार्वेकर म्हणाले, २९ जूनपर्यंत कोणीही शरद पवारांच्या अध्यक्ष पदाला आक्षेप घेतला नव्हता. ३० जूनला शरद पवार पक्षाध्यक्ष आहेत आणि अजित पवारही अध्यक्ष असल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे राष्ट्रवादी अध्यक्ष पदावरुन दोन्ही गटाकडून आपापले नेते पक्षाचे अध्यक्ष असल्याचं सांगत त्यांच्या निवडीचा दावा करण्यात आला. परंतु, दोन्ही गटांकडून पक्षाच्या घटनेप्रमाणे अध्यक्ष निवड झाली नसल्याचा दावा करण्यात आला. दोन समांतर नेतृत्व उभी करण्यात आली. याशिवाय दोन्ही बाजूनं अध्यक्षपदासाठी निवडणूक झाल्याचं दिसून येत नाही.

शिंदे गटाकडून मिलिंद देवरांना मोठं गिफ्ट

राज्यसभेची उमेदवारी जाहीर

मुंबई: भाजपाने महाराष्ट्रातून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजित गोपछडे यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह १५ राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या २७ फेब्रुवारी रोजी ही निवडणूक होणार आहे. उमेदवारांना १५ फेब्रुवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येईल. दरम्यान, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी नुकताच राजस्थानमधून राज्यसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्याचबरोबर सर्वच पक्षांनी राज्यसभेसाठी उमेदवारांची

नावं जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. काही वेळापूर्वी भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रातील तीन राज्यसभा उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत.

भाजपाने महाराष्ट्रातून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजित गोपछडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर, ज्या दोन नेत्यांच्या नावांची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होती त्या पंकजा मुंडे आणि नारायण राणे यांना भाजपाने उमेदवारी दिलेली नाही. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी कालच (मंगळवार, १३ फेब्रुवारी) भाजपात प्रवेश केला आणि आज त्यांना राज्यसभेचं गिफ्ट मिळालं आहे. त्यांच्याबरोबर कोथरूडच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी यांनाही उमेदवारी दिली आहे. कुलकर्णी यांना भाजपाने २०१९ मध्ये विधानसभेसाठी उमेदवारी नाकारली होती. त्यांना यावेळी राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय भाजपाने घेतला आहे. मेधा कुलकर्णी यांना उमेदवारी देऊन भाजपाने त्यांचं एकप्रकारे पुनर्वसन केलं आहे.

दरम्यान, भाजपापाठोपाठ शिवसेनेच्या शिंदे गटानेही त्यांचा राज्यसभेचा उमेदवार जाहीर केला आहे. गेल्या महिन्यात काँग्रेसमधून शिवसेनेत आलेल्या माजी खासदार मिलिंद देवरा यांना शिंदे गटाने राज्यसभेची उमेदवारी दिली आहे. देवरा यांना शिंदे गट दक्षिण मुंबईतून लोकसभेची उमेदवारी देणार असल्याची चर्चा होती. परंतु, शिंदे गटाने त्यांना राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

माजी मंत्री बबनराव घोलप यांचा राजीनामा

नाशिक- शिवसेनेचे उपनेते व २५ वर्ष आमदार राहिलेले बबनराव तथा नाना घोलप यांनी अखेर आज सकाळी आपल्या शिवसैनिक पदाचा राजीनामा देतशिवसेनाला(ठाकरे गट)जय महाराष्ट्र केला.गेल्या अनेक दिवसापासून घोलप हे शिवसेनेला सोडचिठ्ठी देतील या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. मात्र अद्याप त्यांनी कुठल्या पक्षात जाणार हे जाहीर केलेले नाही.याबाबत लोकमतशी बोलताना घोलप यांनी सांगितले की, मी आज माझ्या शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्व पदाचा राजीनामा देत आहे. कारण आजपर्यंत शिवसैनिक म्हणुन मी निष्ठेने व ईमाने ईतबारे काम केले आहे.

मला पक्षाने जे जे सांगितले, ते प्रामाणीकपणे केले आहे. पण अचानकपणे शिर्डी लोकसभा संपर्कप्रमुख पदावरुन वरुन मला काढुन मला अपमानीत करण्यात आले आले. मी ज्यांना निष्क्रीय पदाधीकारी म्हणून काढुन टाकले होते व नविन पदाधीकारी नेमले होते. त्यांना ही बदलण्यात आले, हे कितपत बरे आहे. नाशिक- शिवसेनेचे उपनेते व २५ वर्ष आमदार राहिलेले बबनराव तथा नाना घोलप यांनी अखेर आज सकाळी आपल्या शिवसैनिक पदाचा राजीनामा देतशिवसेनाला(ठाकरे गट) जय महाराष्ट्र केला.

मनोज जरांगे पाटलांच्या समर्थनासाठी नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी बंद

नाशिक : मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून नाशिक जिल्ह्यात बुधवारी विविध ठिकाणी सकल मराठा समाजातर्फे बंद पाळण्यात आला. या बंदला सर्वच ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला आहे. चांदवड, येवला, नांदगाव, दिंडोर, जळगाव नेऊर आदी ठिकाणी बंद पाळण्यात आला.

चांदवड येथे मराठा आरक्षण व मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून सकाळपासून कडकडीत बंद पाळण्यात आला. तर चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीत मराठा बांधवांनी जमून पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांना निवेदन दिले. सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय



अधिकारी कैलास कडलग व तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनाही निवेदन देण्यात आले.

येवला व जळगाव नेऊर येथील सर्व व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभागी होत जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा दिला. शासनाने लवकरात लवकर अधिवेशन बोलून तात्काळ अंमलबजावणी करावी असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार दिंडोरीत बंद होते. सकल मराठा समाजाच्या वतीने शासनाने आंदोलनाची दखल घेत त्वरित सगे सोयरे कायदा पारित करावा अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय नांदगाव येथेही बंद पाळला गेला आहे.

'इंडिया' आघाडीला आणखी एक धक्का!

फारूख अब्दुल्ला जम्मू काश्मीरमध्ये 'एकटे' लढणार!

उत्तर प्रदेशमध्ये जयंत चौधरी आणि पंजाबमध्ये भगवंत मान यांच्यानंतर आता जम्मू-काश्मीरमध्ये विरोधकांच्या इंडिया आघाडीला आणख ीएक धक्का बसला आहे .नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुख अब्दुल्लायांनी जम्मू-काश्मीरमधील लोकसभेच्या पाचही जागांवर स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.फारुख अब्दुल्लाहे इंडियाआघाडीच्या बैठकांना सुरुवातीपासून हजेरी लावत होते. मात्र अचानक त्यांनी असा निर्णयाने घेतल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. दोन-तीन दिवसांपूर्वी फारूख अब्दुल्ला यांना मनी लाँड्रींग प्रकरणात ईडीने समन्स बजावले होते. त्याचाच परिणाम म्हणून अब्दुल्ला यांनी आज असा निर्णय घेतला असल्याची दबक्या आवाजातचर्चा सुरू आहे.

पश्चिम बंगाल, पंजाब आणि दिल्लीत आप पक्षाने तसेच तृणमूलकाँग्रेसनेयापूर्वीचइंडिया आघाडीला धक्का दिला आहे.उत्तर प्रदेशातही

समाजवादी पक्ष आणिकाँग्रेसयांच्यात चर्चा होताना दिसत नाही.अशा परिस्थितीत फारुख अब्दुल्ला यांच्या या निर्णयामुळे भारताची आघाडी आणखी कमकुवत होणार आहे.दिल्लीत काँग्रेसला फक्त एक जागाआम आदमी पार्टीच्या पीएसीच्या बैठकीनंतर दिल्लीत काँग्रेसला एक जागा देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.आपचे खासदार आणि संघटनेचे सरचिटणीस संदीप पाठक म्हणाले की, आम्ही दिल्लीत काँग्रेसला १ जागा देऊ करत आहोत आणि आम आदमी पार्टी लोकसभेच्या ६ जागांवर निवडणूक लढवणार आहे.इंडिया आघाडीत काँग्रेसच्या जागावाटपाच्या विलंबाबाबत, आप खासदार आणि संघटनेचे सरचिटणीस संदीप पाठक म्हणाले, आम्ही युतीमध्ये आलो तेव्हा आमच्या स्वतःच्या हिताचा विचार करण्याचा आमचा हेतू नव्हता. आम्ही प्रामाणिकपणा आणि समर्पणाने आघाडीमध्ये आहोत. खछऊख- चा उद्देश निवडणूक लढवणे आणि देशाला नवा पर्याय देणे हा आहे.उमेदवार वेळेवर जाहीर करणे, प्रचाराची रणनीती ठरवणे हेदेखील यात अपेक्षित आहे.उत्तर प्रदेश, बंगाल, आसाममध्येही धुसफूसनुकतेच आम आदमी पक्षाने आसाममधील लोकसभेच्या ३ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत.उत्तर प्रदेशात अखिलेश यादव काँग्रेसला ८० जागांपैकी केवळ ११ जागा देण्याचे बोलत आहेत.पश्चिम बंगालमध्येही ममता बॅनर्जी यांनीही एकट्याने निवडणूक लढविण्याची भाषा केली आहे. अशा परिस्थितीत इंडिया आघाडी आता किती प्रभावीपणे भाजपाला विरोध करू शकते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

धाराशिवमध्ये मराठ्यांचा बैलगाड्यांसह चक्काजाम

चारा, अंथरूण-पांघरूनासह तळ ठोकला - बाळासाहेब माने

धाराशिव : मराठा आरक्षणाचेनेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा अन्न-पाणी त्यागले आहे. दिवसागणिक त्यांची प्रकृती गंभीर होत चालली आहे. असे असतानाही राज्य सरकार या आंदोलनाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत गुरुवारी संतप्त सकल मराठा बांधवांनी बैलगाड्यांसह धाराशिवकडे कूच केली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात त्यांनी तळ ठोकला आहे. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली आहे. पोलिस यंत्रणेने वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अन्य मार्गाने वाहने वळवली. दरम्यान, यावेळी मराठा तरुणांनी प्रचंड घोषणाबाजी केली.

सरकारने आंदोलनाची दखल घेऊन दिलेली आश्वासने तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणीही करण्यात आली.

सर्जा-राजासाठी चारा अन् अंथरून पांघरून जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून मराठा बांधव बैलगाड्यांसह धाराशिव शहरात दाखल झाले आहेत. त्यांनी येताना सोबत बैलांसाठी लागणारा चारा आणि रात्री झोपण्यासाठी अंथरून पांघरूनही आणले आहे.

जोपर्यंत सरकार न्याय देत नाही तोपर्यंत तसूभरही मागे हटणार नाही, अशी भूमिका मराठा बांधवांनी मांडली.

पुणे - नाशिक आता तीन तासात

औद्योगिक द्रुतगती महामार्गाच्या अंतिम आखणीस मान्यता

पुणे : बहुचर्चित असा पुणे ते नाशिक औद्योगिक महामार्ग बांधण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने जून २०२३ मध्ये घेतला होता .सदर महामार्गाच्या आराखड्यासाठी नेमलेल्या सल्लागार संस्थेने नुकताच अहवाल सादर केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने काही दिवसापूर्वी पुणे नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाच्या २१३ किलोमीटर लांबीच्या अंतिम आखणीस मान्यता देऊन रस्ते विकास महामंडळावर बांधण्याची जबाबदारी सोपवली आहे . त्यामुळे पुणे ते नाशिक हे अंतर पाच तासांवरून केवळ तीन तासात आता पार करता येणे शक्य होणार आहे .

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिलकुमार गायकवाड राजदंड शी बोलताना म्हणाले , पुणे ,नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून त्या दृष्टीने पुणे - नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाच्या अंतिम आखणीस मान्यता मिळाली असल्याने भविष्यात शेतकरी वर्गाचा देखील मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे .

राज्यभरातील दळणवळण व्यवस्था बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ४२१७ किमीचे महामार्गाची जाळी विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे . यातीलच एक भाग म्हणजे पुणे ते नाशिक औद्योगिक महामार्ग आहे .अंदाजे वीस हजार कोटी रुपये इतका अपेक्षित खर्च असलेल्या या १८० किमीच्या महामार्गामुळे पुणे ते नाशिक अंतर कमी वेळेत पार करता येईल .महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करून प्रत्यक्ष स्थळ पाहणीनुसार विविध पर्यायी आखणींचा अभ्यास केला आहे . तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक सुयोग्य आखणीचा महामार्गासाठी विचार करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या आदेशात म्हटले आहे .

औद्योगिक महामार्गाची संपूर्ण जबाबदारी एमएसआरडीसीवर सोपविण्यात आली आहे .हा औद्योगिक द्रुतगती महामार्ग पुणे ,नगर आणि नाशिक जिल्ह्यातून प्रस्तावित करण्यात आला असून नाशिकच्या औद्योगिक क्षेत्राला लाभ होणार आहे .त्याचबरोबर आयटी कंपनीला देखील चालना मिळणार असल्याचे एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले . या द्रुतगती महामार्गामुळे मुंबई - पुणे - नाशिक ही शहरे द्रुतगती महामार्गाने जोडली जातील . राज्यातील द्रुतगती महामार्गाचा सुवर्ण त्रिकोण त्यामुळे साधला जाणार आहे . दळणवळण गतिमान झाल्याने उद्योगांना देखील याचा मोठा फायदा होणार असल्याचे एमएसआरडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान प्रस्तावित द्रुतगती महामार्गाची आखणी रेषा राजगुरुनगर , चाकण, मंचर , नारायणगाव , आळेफाटा , घारगाव , संगमनेर आणि सिन्नर अशा महत्त्वाच्या शहरांजवळून प्रस्तावित आहे . पुणे ते नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाचा भाग पुणे ते शिर्डी साधारण लांबी १३५ किलोमीटर , शिर्डी इंटरचेंज ते नाशिक निफाड इंटरचेंज साधारण लांबी ६० किलोमीटर तसेच सुरत ते चेन्नई द्रुतगती महामार्ग ते नाशिक साधारण लांबी १८ किलोमीटर असा एकूण २१३ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग असेल .

‘धोकादायक’ वृक्षांची कत्तल झाली; पण अपघात थांबले का?

अपघातांना सर्वस्वी जबाबदार ठरवून वृक्षांची कत्तल केली जात आहे. चुकीचे गृहीतक आणि आधीच काढलेला निष्कर्षही चुकीचाच. परिणाम तर भोगावेच लागतील.. ‘धोकादायक’ वृक्षांची कत्तल झाली; पण अपघात थांबले का?शेखर गायकवाड,संस्थापक अध्यक्ष,आपलं पर्यावरण, नाशिकअलीकडे रस्ते अपघातांची संख्या प्रचंड वाढली आहे आणि त्यात मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी होते आहे हे खरेच; पण त्याला सर्वस्वी रस्त्यातली झाडेच जबाबदार आहेत का? मुळात ही ‘धोकेदायक’ झाडेच अपघातांना जबाबदार आहेत असे मानून वर्षानुवर्षांच्या, अगदी ज्या झाडांची शंभरी उलटली आहे, अशा झाडांची कत्तल करणे सुरू आहे. मुळात गृहीतकच चुकले आणि त्याचा निष्कर्षही आधीच काढून त्याप्रमाणे आपण कृती केली तर त्याचे आणखी भयंकर परिणाम आपल्याला भोगावे लागतील. अपघातांना जबाबदार धरून मोठमोठ्या वृक्षांची जी कत्तल सध्या सुरू आहे, त्याबाबत हेच दिसते आहे.बरे, मग ज्याठिकाणी ही झाडे मुळापासून उखडून, त्यांची कत्तल करून नवे रस्ते बांधले गेले, ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांचे रुंदीकरण केले, तिथले अपघात थांबलेत का? - तर तसे नाही. हे अपघात थांबलेले नाहीत. याचा अर्थ जिथे अपघात होत होते, त्याला सर्वस्वी रस्त्यातली झाडेच जबाबदार नव्हती. त्यामुळे या प्रश्नाकडे नव्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे आणि शक्य तितकी झाडे वाचवून रस्त्यांबाबत पुनर्विचार करणे गरजेचे आहे.लोकसंख्यावाढीमुळे आणि वाहनांची संख्या वाढल्यामुळे प्रत्येक शहराची रस्त्यांची गरज वाढली आहे. त्यामुळे रस्त्यांचे रुंदीकरणही अपेक्षित आणि गरजेचे झाले आहे. काही अपवादात्मक ठिकाणी शंभर-दीडशे वर्षांपूर्वीची काही झाडे रस्त्याच्या मध्यभागी, साईड मार्जिनमध्ये आहेत. त्यातील काही वृक्ष नक्कीच काढण्याची गरज आहे व ते काढले पाहिजेत, पण काही वृक्ष आपण कल्पकतेने नक्कीच वाचवू शकतो.अपघात होतात त्यावेळी ज्या घरातला माणूस जातो,

त्यांना खूप काही सहन करावे लागते, हे निर्विवाद सत्य, पण या अपघातांना जबाबदार धरून वृक्षांची सरसकट कत्तल करणेही तितकेच चुकीचे. वृक्षतोड करून भविष्यातल्या पिढीला काय वारसा देणार, असे आपण म्हणतो, पण वर्तमानातच त्याचे भयंकर परिणाम आपल्याला भोगावे लागल्याचे आपण सातत्याने पाहतो आहोत. त्यासाठी काही गोष्टींचा साकल्याने विचार, आत्मपरीक्षण आणि तशी कृती आपल्याला करावीच लागणार आहे.शहरातले रस्ते म्हणजे काही महामार्ग नाहीत; जिथे गाड्यांचा वेग ८० किलोमीटर प्रतितास असणे गरजेचे आहे. पण शहरातही वेगाने वाहने चालवली जातात. वेगमर्यादेचे हे बंधन स्वयंस्फूर्तीने पाळले जाणे गरजेचे आहे. रस्ता रुंदीकरण करताना ट्रॅफिक जाम न होता नागरिकांना त्या रस्त्यावरून मर्यादित वेगात सुरळीतपणे जाता येणे अपेक्षित आहे. शहरातल्या रस्त्यांवर बऱ्याच ठिकाणी रोज अपघात होतात व त्यात काही जणांना जीवही गमवावा लागतो. बऱ्याचदा सिग्नलवरही अपघात होतात, अतिघाई आणि सिग्नल तोडण्याचा अट्टाहास नडतो. अति वेगामुळे दुभाजक तोडून उलटलेली वाहने आपण पाहतो. मग अशा वेळेस सिग्नल बंद करायचे की दुभाजकच काढून टाकायचे? अपघातास ‘कारणीभूत’ ठरतात म्हणून इतक्या मेहनतीने उभी राहिलेली शंभर-दीडशे वर्षे वयाचे वृक्षच उखडून टाकणे किती शहाणपणाचे आहे?

अशा वृक्षांच्या अलीकडे गतिरोधक टाकले आणि काही वृक्षांच्या रस्त्याकडील फांद्यांची योग्य छाटणी केली, त्यांच्या खोडावर चांगल्या प्रतीचे रिफ्लेक्टर लावले, तर अपघात होण्याची शक्यता जवळपास मिटेल आणि हे वृक्षही जगताना, आपल्यालाही जगवतील. याचा विचार कोण करणार?रस्ते रुंदीकरणात वृक्षतोडीचा आजवरचा इतिहास बघितला, तर ज्या रस्त्यांवर वृक्षतोड होऊन रस्ता रुंदीकरण झाले आहे अशा रस्त्यांची आज काय परिस्थिती आहे? रस्ते खरेच एकदम चकाचक आहेत का? त्यावर एकही खड्डा नाही का? वेगांची मर्यादा तिथे पाळली जाते का? तिथली अतिक्रमणे हटली, हटवली का? अतिक्रमण कोण करते आहे? त्यांना कुणाची साथ आहे? गावागावातल्या आणि शहराशहरांतल्या नव्या-जुन्या रस्त्यांवर, जिथे जिथे रस्त्यांचे रुंदीकरण झाले आहे, त्या रस्त्यांवर नजर टाकली तर काय चित्र दिसते?या रस्त्यांवर अनेक ठिकाणी अनधिकृत पार्किंग तयार झाले आहे. बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दोन ओळींमध्ये भाजी बाजार बसतोय. फेरीवाल्यांची गर्दी झाली आहे. काही ठिकाणी वेगवेगळी स्थायी, अस्थायी दुकाने थाटली गेली आहेत, रस्ते बळकावले गेले आहेत, त्यांचा श्वास घुसमटतोय. या अतिक्रमणांमुळे बऱ्याच ठिकाणी तीन पदरी रस्त्यांवरही केवळ एकच लेन वापरली जातेय. त्यावर कोणाचा वरदहस्त आहे? वृक्षांमुळे जर खरोखरच अपघात होत असतील, तर ते जरूर काढावेत, त्यांचे पुनर्रोपण करता येणे शक्य असेल तर तेही अवश्य करावे, पण त्याआधी सगळ्याच गोष्टींचा साधकबाधक विचार होणे गरजेचे आहे. शहराचा विकास एकतर्फी न होता, समतोल विकास ही काळाची गरज आहे.

मंगळवार दि.२० रोजी भोरमध्ये भव्य रोहिडा केसरी बैलगाडा शर्यत

युवा नेते अनिलनाना सावले युवा मंच तर्फे आयोजन

भोर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त युवा नेते अनिलनाना सावले युवा मंच तर्फे मंगळवार (दि.२०) रोजी सकाळी ९ वाजता भोर येथील कॉलेज फाटी वाघजाई माता मंदिरामागील मैदानात भव्य रोहिडा केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून जस्तीत जास्त गाडा मालकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन युवा नेते अनिलनाना सावले यांनी केले आहे.

शर्यतीसाठी आकर्षक बक्षीस ठेवले असून प्रथम क्रमांकाच्या बैलगाडीस एचएफ डिलक्स दोनचाकी मोटार सायकल युवा उद्योजक अनिलनाना सावले यांच्या सौजन्याने, दुसऱ्या क्रमांकाच्या बैलगाडीस ४१००० रुपये रोख मा.उपनगराध्यक्ष रामचंद्रनाना आवारे यांच्या सौजन्याने, तिसऱ्या क्रमांकाच्या बैलगाडीस ३१००० रुपये रोख नेरे गावचे सरपंच विजय बढे यांच्या सौजन्याने चौथा क्रमांकाच्या बैलगाडीस २१००० रुपये रोख युवा उद्योजक नवनाथ मानकर यांच्या सौजन्याने पाच क्रमांकाच्या बैलगाडीस १५००० रुपये रोख संभाजी घोलप यांच्या सौजन्याने सहा क्रमांकाच्या बैलगाडीस ११००० रुपये रोख युवा उद्योजक कुणाल बुदगुडे यांच्या सौजन्याने सात क्रमांकाच्या बैलगाडीस ७००० रुपये रोख धोंडीबा पाटणे यांच्या सौजन्याने आठ क्रमांकाच्या बैलगाडीस ५००० रुपये रोख किसान सेलचे अध्यक्ष संजय मळेकर यांच्या सौजन्याने तर सर्व क्रमांकाच्या बैलगाडीस ढाल प्रशांत खोपडे यांच्या सौजन्याने देण्यात येणार आहे. शर्यतीत सहभाग घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने नोंद करण्यात येणार असून सुमारे १००१ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे.

शिवनेरी येथे १७ ते १९ फेब्रुवारीला 'हिंदवी स्वराज्य महोत्सव

पुणे : शिवनेरी येथे १७ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत 'हिंदवी स्वराज्य महोत्सव'पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरात १७ ते १९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीतछत्रपती शिवाजी महाराजयांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त राज्याचा पर्यटन विभाग आणि पुणे जिल्हा प्रशासन यांच्यावतीने 'हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस होणाऱ्या या महोत्सवाच्या माध्यमातूनमहाराष्ट्राचीसंस्कृती, समृद्ध इतिहासाला उजाळा मिळणार आहे.

इतिहासाची साक्ष देणाऱ्या जुन्नर शहरात तीन दिवस कला, संगीत, साहस आणि अध्यात्मविषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या महोत्सवाला शिवप्रेमी, दुर्गप्रेमी, पर्यटक आणि सर्व नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. पर्यटनमंत्री महाजन म्हणाले, हिंदवी स्वराज्य महोत्सव २०२४ हा इतिहास, संस्कृती आणि साहस यांचा सुरेख संगम घडवणारा असेल. पर्यटन विभाग गेले वर्षभर आपल्या संस्कृतीवर आधारित वेगवेगळे महोत्सव साजरे करत आहे. आपली स्थानिक संस्कृती, समृद्ध वारसा याची माहिती नव्या पिढीला आणि पर्यटकांना होण्यासाठी महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. शिवनेरी फेस्टिवल २०२४ मध्ये विविध उपक्रमपारंपरिक संगीत, नृत्य आणि नाट्य यांचा समावेश असेलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून, हस्तकला प्रदर्शन, चवदार आणि मनमोहक अशा पाककृती, कार्यशाळा, क्वाड बायकिंग, पेंटबॉल, तिरंदाजी, गिर्यारोहण, रॅपलिंग, झिपलायनिंग, स्पीड बोटींग, वॉल क्लाईंबिंग अशा साहसी खेळांचा अनुभव, कुकडेश्वर मंदिर, नागेश्वर मंदिर, हरिश्चंद्रेश्वर मंदिर, काशी ब्रह्मनाथ मंदिर, अष्टविनायक मंदिर, लेण्याद्रि मंदिर, ओझर मंदिर, ज्योतिर्लिंग मंदिर, भीमाशंकर मंदिर आणि त्र्यंबकेश्वर मंदिर दर्शन, निरभ्र रात्री लेकसाईड ग्लॅंपिंग आणि स्टारगेझिंगचा आनंद अनुभवता येणार आहेत. विविध किल्ल्यांची चढाई करत स्वत:ला आव्हान द्यावे - किल्ले हडसर, निमगिरी - हनुमंतगड, नाणेघाटासोबत जिवधनगड, कुकडेश्वर मंदिरासोबत चावंडगड. दोन दिवसीय गिर्यारोहण स्पर्धेत सहभागी व्हावे, कँपिंगसोबत हरिश्चंद्रगड ट्रेक आणि हडपसर - निमगिरी - हनुमंतगड - नाणेघाट - जिवधन येथे गिर्यारोहण हा उपक्रम देखील आयोजित केला आहे.सांस्कृतिक कार्यक्रम व विविध बचतगटांचे प्रदर्शनया महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून हे सर्व कार्यक्रम शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय मैदान, तालुका जुन्नर जिल्हा पुणे येथे होणार आहेत.

दि. १७ ते १९ फेब्रुवारी २०२४ रोजी स. १०:०० ते रात्री ०९:०० विविध बचत गटांची उत्पादने व खाद्यपदार्थांच्या स्टॉलचे प्रदर्शन असेल. दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ रोजी, सायं. ०६:३० ते ०७:३० वा. छत्रपतींची मानवंदना शाहीर सुरेश जाधव यांचा पोवाडा पर कार्यक्रम., सायं. ०७:३० ते रात्री ९.३० वा. जाणता राजा (महानाट्य) चे आयोजन. दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी सायं. ०६:३० ते ०७:३० वा. गर्जामहाराष्ट्रमाझा ही नृत्य नाटिका, सायंकाळी ०७:३० ते रात्री ९.३० वा.छत्रपती शिवाजी महाराजांच्यायुद्धनीतीचे दर्शन घडवणारा गनिमी कावा हा कार्यक्रम. दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९ ते ११ शिवजन्मोत्सव सोहळा, सायं. ०६:१५ ते ०७:०० वा. महा शिवआरती कार्यक्रम, सायं. ०६.३० ते ०७:३० वारी सोहळा संताचा (नृत्य), सायं ०८:३० ते ९.३० वा. शिवशंभु शौर्यगाथा-शिव सह्याद्री (महानाट्य) या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

अगोदर मोबदला

मगच शक्तीपीठ, ग्रीनफिल्डचे भूसंपादन

सांगली : जिल्ह्यातून जाणाऱ्या पुणे बेंगलोर ग्रीनफिल्ड आणी शक्तीपीठ महामार्गांसाठीमोठ्या प्रमाणात जमीन अधिग्रहीत करावी लागणार आहे. या जमिनींसाठी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे, अन्यथा सरकारला हिसका दाखवू असा इशारा किसान सभेने दिला आहे. अगोदर मोबदला, मगच शक्तीपीठ, ग्रीनफिल्डचे भूसंपादन अशी भूमिका जाहीर केली आहे.

सभेचे प्रदेशाध्यक्ष उमेश देशमुख यांनी सांगितले की, सरकारच्या प्रचलित धोरणानुसार भूसंपादनापोटी फारच कमी रक्कम शेतकऱ्यांना मिळणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार आहे. याबाबत मंगळवारी (दि. १३) महसूल मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांच्यासोबत किसान सभेच्या शिष्टमंडळाची चर्चा झाली. त्यांनी सांगीतले की, जमिनींच्या मोबदल्याविषयी केंद्राला विनंती केली आहे.

पण केंद्र सरकार मोबदल्याच्या प्रचलित पद्धतीत बदल करण्यास तयार नाही. त्यामुळे राज्य सरकार हतबल आहे. राज्यातील शेतकऱ्यांना जास्तीजास्त भरपाई मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे टोकाचा आग्रह धरायला राज्य शासन तयार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळेच सुरत-चेन्नईमहामार्गासाठीजबरदस्तीने जमीन अधिग्रहण चालू आहे. अगोदर मोबदला जाहीर करा

दरम्यान,सांगलीजिल्ह्यात ही जबरदस्ती चालू देणार नाही असा इशारा किसान सभेने दिला आहे. देशमुख म्हणाले, योग्य मोबदला निश्चित झाल्याशिवाय कोणतेही काम सुरु करु देणार नाही. प्रथम मोबदला किती आणि कसा देणार? हे शासनाने जाहीर करावे आणि मगच काम सुरु करावे.

खटाव तालुकावासिय विविध प्रकल्पाच्या पाण्यासाठी आक्रमक

सर्वपक्षीयाकडून खटाव तालुका पाणी संघर्ष समितीची स्थापना

वडूज : खटाव तालुक्यातील बहुतांशी भागात पुरेसा पाऊस न झाल्याने जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेली आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. शेती पाण्याची आणि पिण्याची पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. तर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मोठ्या प्रमानात निर्माण झाला आहे. विहिरींनी तळ गाठल्याने पिके पाण्यावाचून अडचणीत आली आहेत. तर येरळवाडी धरणाने तळ गाठला आहे. येरळवाडी धरणामध्ये पुरेसा पाणीसाठा नसल्यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला आहे तर पिण्याच्या पाण्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. दुसरीकडे

जिहे कटापूर योजनेमधून माणगंगा धरण भरले जात आहे. गेले अनेक दिवस चातक पक्षाप्रमाणे वाट पाहणाऱ्या मान वासियांच्या दृष्टीने ही बाब आनंददायी आहे. मात्र खटाव तालुक्यातील जनतेवर अन्याय का असा सवाल पाणी संघर्ष समितीने उपस्थित केला आहे. आपल्यावर अन्याय होत असल्याने पाण्याबाबतचा लढा नेटाने लढण्यासाठी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी आणि शेतकरी एकत्रित आल्याचे यावेळी सांगितले .

खटाव तालुक्यातील येरळा धरणातील शेतकऱ्यांचे विद्युत पंप प्रशासनाने जप्त केले आहेत. परिणामी अनेकांची पिके वाळून चालली आहेत, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचीही समस्या निर्माण झाली आहे. जिहे कटापुर योजनेतून खटाव तालुक्यातील येरळा नदीवरील १५ बंधारे भरून ११७०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याची योजना आहे. मात्र गेल्या वर्षात जिहे कटापुर योजनेचे चार वेळेला पाणी सोडण्यात आले मात्र भुरकवडी बंधाऱ्याच्या पुढे ते येऊ दिले जात नाही. त्यामुळे दुसरीकडे खटाव तालुका उपेक्षित ठेवला जात असल्याची भावना खटाववसियांच्या मनात निर्माण झाली आहे, असे पाणी संघर्ष समिती म्हणाली त्यामुळे या अन्यायाविरोधात लढण्यासाठी खटाव तालुकावासिय आक्रमक झाले असून वाकेश्र्वर सर्किट हाऊसमध्ये तालुक्यातील पाणी प्रश्नावर लढणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी खटाव तालुका पाणी संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली.

उरमोडी, तारळी आणि जिहे कटापुर आणि औंध सह १९ गावे पाणी उपसा सिंच योजनेतल्या लाभक्षेत्रातील शेतकरी

कष्टकरी जनतेने खटाव तालुका पाणी संघर्ष समिती हे नविन व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. पानीप्रश्नावर लवकरच जनआंदोलन उभे केले जाणार असल्याचे यावेळी ठरवण्यात आले.

जिहे कटापुर योजनेतून येरलामाई प्रवाहित करून तातडीने येरळा धरण भरावे, तारळी धरणाचे हककाचे पाणी लाभक्षेत्रातील गावांना देण्यासाठी अर्धवट राहिलेले वितरीकेचे काम तातडीने पूर्ण करा आणि उरमोडी कालव्याचे आवर्तन तालुक्यातील गावांना तातडीने द्या या प्रमुख मागण्यांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी अंबवडे, बनपुरी, येरळवाडी,

नढवल, गणेशवाडी, कातरखटाव पिंपळवाडी सह लाभ क्षेत्रातील अनेक गावचे शेतकरी आणि पाणी प्रश्नावर लढणारे कार्यकर्ते उपस्थित होते.

सरकारी कार्यालयांच्या वीजबिलांची थकबाकी २३ कोटींवर

पश्चिम महाराष्ट्रातील स्थिती; थकबाकी भरा, महावितरणकडून लेखी विनंती

पुणे : वीजबिलांच्या वाढत्या थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक स्थिती खडतर होत असताना काही विभागाच्या सरकारी कार्यालयांकडे वीजबिलाची थकबाकी वाढली आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील प्रामुख्याने पोलीस विभाग व जिल्हा परिषदेच्या ७३६५ विविध कार्यालयांच्या वीजबिलांची थकबाकी तब्बल २१ कोटी ४० लाख रुपयांवर गेली आहे. यासोबतच पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १३९२ कार्यालयांच्या वीजबिलांची थकबाकी १ कोटी ७३ लाख ५० हजार रुपये झाली आहे.

दरम्यान महावितरणचे पुणे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे यांनी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त, पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस विभागाचे पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना वीजबिलांच्या थकबाकीची रक्कम तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी अशी विनंती करणारे पत्र पाठवले आहे. या पत्रासोबतच संबंधित थकबाकीदार कार्यालयांची यादी देखील जोडण्यात आली आहे.

पश्चिम महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांकडून मासिक वीजबिलांचा भरणा होत नसल्याने थकबाकीमध्ये वाढ होत आहे. सध्या पश्चिम महाराष्ट्रात घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील १७ लाख ८५ हजार वीजग्राहकांकडे ३३२ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरणने वीजपुरवठा खंडित करण्याची धडक मोहीम सुरु केली आहे. यासोबतच वीजबिलांची सर्वाधिक थकबाकी असलेल्या सरकारी कार्यालयांची यादी देखील तयार करण्यात आली आहे. संबंधित कार्यालयांकडे थकबाकी भरण्यासाठी महावितरणकडून पाठपुरावा सुरू आहे. थकीत रकमेचा भरणा झाला नाही तर प्रसंगी वीजपुरवठा खंडित करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यात ४ हजार ३४८ सरकारी कार्यालयांकडे ८ कोटी ५७ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या ५५२ कार्यालयांकडे ६३ लाख, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ८४० कार्यालयांकडे १ कोटी ११ लाख, पुणे जिल्हा परिषदेच्या १९१३ कार्यालयांकडे ५ कोटी ५८ लाख तसेच पुणे, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण पोलीस विभागाच्या १०४३ कार्यालयांकडे १ कोटी २५ लाख रुपये थकीत आहे.

सातारा जिल्ह्यात १३९३ सरकारी कार्यालयांच्या वीजबिलांची २ कोटी ११ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये सातारा जिल्हा परिषदेच्या १२८५ कार्यालयांच्या १ कोटी ९७ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या १०८ कार्यालयांच्या १३ लाख रुपयांच्या थकबाकीचा समावेश आहे. तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या १६२१ कार्यालयांचे ४ कोटी ७६ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या ८५ कार्यालयांचे १७ लाख असे एकूण १७०६ कार्यालयांकडे ४ कोटी ९३ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी सोलापूर जिल्ह्यात आहे.

सांगली जिल्हा परिषदेच्या ८९२ कार्यालयांकडे २ कोटी ९ लाख आणि पोलीस विभागाच्या २१९ कार्यालयांकडे १८ लाख असे एकूण १ हजार १११ कार्यालयांकडे २ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी सांगली जिल्ह्यात आहे. तर कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या १४६ कार्यालयांकडे ५ कोटी १९ लाख आणि जिल्हा पोलीस विभागाच्या ५३ कार्यालयांकडे ६ लाख असे एकूण १९९ कार्यालयांकडे ५ कोटी २६ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी कोल्हापूर जिल्ह्यात आहे.

मुख्य संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

उत्तर पुणे जिल्हा भारतीय जनता पक्षाच्यावतीने

शिरुर लोकसभा मतदार संघातील नागरीकांना रामलल्ला दर्शन सहलीचे नियोजन

राजगुरुनगर : अयोध्यस्थीत प्रभू श्रीराम (रामलल्ला) यांचे दर्शनासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातील एकूण १३४४ श्रीरामभक्त पुण्यावरून विशेष अशा आस्था एक्स्प्रेस रेल्वेने अयोध्या येथे गेले आहेत. मंगळवार (दि.१३) रोजी सायंकाळी ७ वाजून २५ मिनिटांनी ही विशेष रेल्वे गाडी पुणे रेल्वे स्थानकावरून सोडण्यात आली असून (दि. १५) रोजी सकाळी ९ वाजून २० मिनिटांनी अयोध्या मध्ये दाखल होणार आहे. अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांनी दिली.

१३४४ राम भक्तांमध्ये जुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड, हवेली आणि हडपसर या परिसरातील श्रीराम भक्तांचा समावेश आहे. मंगळवार (दि.१३) रोजी रात्री पुणे रेल्वे स्टेशनवरून या विशेष आस्था एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, जिल्हा सरचिटणीस संजय रौंधळ, डॉ. ताराचंद कराळे, भगवान शेळके, तालुकाध्यक्ष आबासाहेब सोनवणे (शिरूर), श्याम गावडे (हवेली), मारुती शेळके (शिरूर बेट), संदीप बानखेले (आंबेगाव), संजय थोरात, अमित सोनवणे, महिला मोर्चा अध्यक्ष पूनम चौधरी, विस्तारक श्रीकृष्ण देशमुख, खेड तालुका भाजपा उपाध्यक्ष सुनील देवकर यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या यात्रेतील १३४४ श्रीराम भक्तांची निवास, भोजन आणि इतर सर्व व्यवस्था करण्यात आली असून दर्शनाची देखील विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

रेल्वे प्रवासात देखील चहा, नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था करण्यात आली. रेल्वेमध्ये आणि आयोध्येत सुद्धा राम भक्तांच्या सेवेसाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून तसेच केंद्र सरकारने अतिशय वाजवी दरामध्ये रेल्वे सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल शरद बुट्टे पाटील यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्यातील नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांतदादा पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

दरम्यान दर्शनानंतर सर्व राम भक्त सदर रेल्वेने (दि.१६) रोजी संध्याकाळी ५ वाजून २० मिनिटांनी परत निघणार असून दि. १८ फेब्रुवारीला पहाटे ४ वाजता पुणे रेल्वे स्टेशन येथे पोहोचणार आहे.

रेल्वे नियोजन प्रमूख दत्ता टेमगिरे, कोच प्रमूख म्हणून अमोल राऊत, वैशाली तांबे, पुजा सनस, सचिन पांडे, अश्विनी पांडे, सागर राळे, अर्चना बुट्टे, प्रीतम शिंदे, महेंद्र पिंगळे, श्रीराम बांगर, भगवान शेळके आदी काम करत आहेत. द्यानेश्वर नरके, राजश्री जाधव, निलेश भुजबळ, प्रमोद टिळेकर, शोभा लगड, अनिल येवले, ओमकार सोनार हे सर्व काम पाहत आहेत.

येरवडा कारागृहात कैद्यांची दादागिरी

आरोपींची जेलमध्ये मारहाण

पुणे : येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये बंदिस्त असलेल्या मारहाणीच्या गुन्ह्यातील एका आरोपीने अन्य १० कैद्यांच्या मदतीने कारागृहात तुरुंग अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यास मारहाण केल्याचा प्रकार घडला आहे. तुरुंग अधिकारी शेरखान पठाण यांना लाथा बुक्क्यांनी कैद्यांनी मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना गुरूवारी (ता. १५) सकाळी नऊच्या सुमारास घडली.

दोन दिवसांपूर्वी दहा ते बारा कैद्यांमध्ये आणि शेरखान पठाण यांच्यामध्ये बाचाबाची झाल्याची माहिती समोर आली आहे. येरवडा कारागृहातील इतर अधिकारी या घटनेची माहिती घेत आहेत. आरोपींनी मारहाण केल्याने पठाण गंभीर जखमी झाले आहेत. आरोपींनी पठाण यांना शिवीगाळ केली. त्यावरून ही मारहाण झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

येरवडा कारागृहामध्ये बंदिस्त असलेल्या विकी बाळासाहेब कांबळे (रा. बनेश्वर महादेव मंदिर जवळ ,धनकवडी) या आरोपीवर कारागृह प्रशासनाने कारवाई करून त्याच्या विरोधात येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. येरवडा कारागृह प्रशासनाने यासंदर्भात माहिती देताना, विकी बाळासाहेब कांबळे हा आरोपी शहरातील धनकवडी भागातील रहिवासी आहे. सहकारनगर पोलिस ठाण्यात त्याच्या विरोधात मारहाण, धमकी देणे या कलमनुसार गुन्हे दाखल आहेत. २५ जानेवारी पासून तो कारागृहात बंदिस्त आहे. त्याचप्रमाणे न्यायाधीन बंदी प्रकाश विठ्ठल रेणुसे (रा. धनकवडी) याच्या विरोधात भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा तसेच आर्म क्टचा गुन्हा दाखल आहे. तो १७ फेब्रुवारी २०१८ पासून येरवडा कारागृहात दाखल आहे.

या दोन्ही कैद्यांना सर्कल क्रमांक १ मध्ये बंदिस्त ठेवण्यात आले होते. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊच्या सुमारास दरम्यान सर्कल क्रमांक एक येथे तुरुंग अधिकारी शेरखान पठाण हे नियमितपणे कर्तव्यावर होते. त्यावेळी सर्कल क्रमांक एकमधील आरोपी विकी कांबळे व प्रकाश रेणुसे यांच्यात किरकोळ कारणावरून वाद सुरू होते.

त्यावेळी त्या ठिकाणी गेलेल्या पठाण यांना संबंधित दोन कैद्यांनी आणि इतर दहा कैद्यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच बाजूला असलेली कार्यालयातील खुर्ची शेरखान पठाण यांना मारण्याचा प्रयत्न केला. परंतु संबंधित ठिकाणी उपस्थित असणाऱ्या इतर कैद्यांनी ती अडवली.

उजव्या डोळ्याला लागला मार...

मारहाणीत शेरखान पठाण यांच्या उजव्या डोळ्याखाली जखम तसेच डाव्या हाताच्या मनगटाला इजा होऊन फ्रॅक्चर झाले आहे. घटनेच्या ठिकाणी इतर अधिकारी कर्मचारी यांनी परिस्थिती नियंत्रणात आणून गैरवर्तन करणाऱ्या कैद्यांना वेगवेगळ्या अन्य विभागात पाठवले आहे. या घटनेच्या अनुषंगाने गैरवर्तन करणाऱ्या कैद्यांविरोधात येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यासोबत कारागृह प्रशासनाकडून पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ यांनी दिली.

मराठा आरक्षणाबाबत राजू भोर यांचा उपोषण सोडण्यास नकार

आमदार व तहसीलदार यांची विनंती अमान्य

***नारायणगाव (सा.वा.) :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे व त्याचे कायद्यात रूपांतर व्हावे यासाठी मराठा नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हिवरे तर्फे नारायणगाव (ता.जुन्नर) येथील युवक राजू भोर हा गेली सहा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसला आहे.

वीस तारखेला मराठा आंदोलनासंदर्भात विशेष अधिवेशन बोलवण्यात येणार असून आपण उपोषण मागे घ्यावे यासाठी जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांनी राजू भोर यांना विनंती करण्यासाठी आज हिवरे तर्फे नारायणगाव येथे उपोषण स्थळी भेट दिली. मात्र आपण उपोषण सोडणार नसल्याचे भोर यांनी सांगितले.

यावेळी आमदार अतुल बेनके यांच्यासह तहसीलदार रवींद्र सबनीस, तसेच स्थानिक ग्रामस्थ विकास भोर, नितीन भोर, शिवदास विधाटे, संतोष खोखराळे,नारायण भोर, गावातील ज्येष्ठ नागरिक महिला आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नेमके आमदार अतुल बेनके, तहसीलदार सबनीस तसेच तेथील गावकऱ्यांनी देखील उपोषणकर्ता राजू भोर यांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले.

मात्र आपण प्रथम आमचे नेते मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवा त्यानंतरच मी उपोषण मागे घेईल अशी भूमिका घेतली यावेळी डॉक्टर प्रवीण शिंदे यांनी राजू भोर यांची तपासणी करून यापुढेही जर उपोषण चालू ठेवले तर आपल्या किडनीसह इतर अवयवांना धोका होऊन तब्येत खालवली जाईल अशी माहिती दिली तरी राजू मोरे यांनी उपोषण सोडण्यास नकार दिला.

साताऱ्यात दि. १७ ते १९ या कालावधीत शिवजयंती महोत्सवाचे आयोजन

सातारा - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवजयंती महोत्सव समिती राजधानी सातारा यांच्यावतीने ऐतिहासिक शाहूनगरीत दि. १७ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत भव्य शिवजयंती महोत्सव २०२४ चे आयोजनकरण्यात आले आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली आहे.

शनिवार दिनांक १७ रोजी सायंकाळी ५ वाजता गांधी मैदान राजवाडा येथे महाराष्ट्राचे शिरोमणी लोकशाहीर विठ्ठल उमप प्रस्तुत ख्यातनाम, प्रसिद्ध कलाकार नंदेश उमप निर्मित शिव सोहळा हा ऐतिहासिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात शिवजन्मापासून शिवराज्याभिषेकापर्यंत शिवरायांच्या सर्व ऐतिहासिक घटना आणि पराक्रम प्रेक्षकांना विनामूल्य पाहता येणार आहेत. जाणता राजा या कर्यक्रमानंतर साताऱ्यात प्रथमच घोडे आणि १०० कलाकारांचा सहभाग असलेला भव्यदिव्य असा शिव सोहळा हा कर्यक्रम होणार असून याचा लाभ तमाम सातारकरांनी घ्यावा.

रविवार दिनांक १८ रोजी सायंकाळी ५ वाजता किल्ले अजिंक्यतारा येथे भव्य मशाल महोत्सव होणार असून हजारो मशालींनी किल्ले अजिंक्यतारा उजळून निघणार आहे. चला सातारकरांनो आपणही आपला सहभाग नोंदवूया आणि एक मशाल माझ्या राजासाठी स्वतः लावूया, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच सुनिल बापू लाड (कवलापूर) सांगली यांचे व्याख्यान होणार असून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सातारा शहरातील काही संस्था व व्यक्ती यांचा सन्मान केला जाणार आहे.

सोमवार दिनांक १९ रोजी सायंकाळी ५ वाजता गांधी मैदान येथून भव्य आणि विराट शिव मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीचे खास आकर्षण म्हणजे केरळ येथील १०० कलाकारांचा सहभाग असलेले प्रसिद्ध केरळ वाध्यपथक ! या शाही मिरवणुकीत हत्ती, घोडे, उंट यासह ऐतिहासिक देखावे असणार आहेत. या मिरवणुकीचा समारोप पोवई नाका येथे होणार असून रात्री ८.३० वाजता शिवतीर्थ येथे छत्रपती शिवरायांची आरती तसेच फटाक्यांची नयनरम्य आतिषबाजी होणार आहे. मिरवणुकीत आणि आरती कार्यक्रमात सर्वांनी सहभागी घेऊन आपल्या लाडक्या राजाला मानवंदना द्यावी, असे वाहन समितीमार्फत करण्यात आले आहे.

या भव्यदिव्य, ऐतिहासिक शिवजयंती महोत्सवानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमात सहभागी होऊन सोहळ्याचा प्रत्येक ऐतिहासिक क्षण याची देही याची डोळा पाहण्याची संधी सातारकरांनी दवडू नये, असे आवाहन समितीने केले आहे.

नागठण्यात होणार भव्य बैलगाडी शर्यत

नागठाणे : छ.खा. उदयनराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त नागठाणे (ता.सातारा)येथे भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा दि.२३ फेब्रुवारी ला होत आहे.

या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस २लाख १ हजार ७ रुपयांचे आहे.दुसरे १ लाख ५१ हजार ७ रुपये तृतीय १ लाख १ हजार ७ रुपयांचे चतुर्थ क्रमांकासाठी ५१ हजार ७ रुपये पाचव्या क्रमांकासाठी ३५ हजार ७ सहाव्या स्थानासाठी २५ हजार ७ सातव्या स्थानासाठी १५ हजार ७ रुपये,व आठव्या क्रमांकासाठी ११ हजार ७ रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत.ही स्पर्धा नागठाणे येथील छ.शिवाजी महाराज स्टेडियम येथे आयोजित करण्यात आली आहे.

अटल सेतू लगतचे रस्ते पालिकेला द्या

मुंबई: शिवडी कॉटन ग्रीन भागातील हाजी बंदर रोड , फॉसबेरी रोड आणि मेसेन्ट रोड हे रस्तेमुंबईमहापालिकेकडे हस्तांतरित करावेत अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन पडवळ यांनी केली आहे.शिवडी कॉटन ग्रीन भागातील प्रभाग क्रमांक २०६ मधील शिवडी पूर्वेकडील पट्टा मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अखत्यारीत आहे. या ठिकाणी सुमारे ४० हजार लोक राहतात आणि १० हजार घरे आहेत. या परिसरात हाजी बंदर रोड , फॉसबेरी रोड आणि मेसेन्ट रोड हे अटल सेतूला जाण्यासाठीचे आहेत. या मार्गाने दिवसभरात हजारो वाहनांची ये-जा सुरु असते. या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणवर खड्डे आहेत. दिवाबत्तीची व्यवस्था , स्वच्छता आदीची वानवा आहे. ज्या प्रकारे मेसेन्ट रोड वरील ईस्टर्न फ्रीवे पालिकेकडे हस्तांतरित झाला त्याच धर्तीवर अन्य रस्तेही करावेत, असे त्यांनी पालिका आयुक्तांना लिहिलेल्या पात्रात नमूद करण्यात आले आहे.अटल सेतूला लागून असलेले रस्ते मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात आहेत. मात्र त्यांची व्यवस्थित देखभाल होत नाही, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन २० फेब्रुवारी रोजी

सातारा : माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये सोमवार दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजंयती निमित्त शासकीय सुट्टी आयोजित असल्याने जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन २० फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथील नियोजन भवन येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आलेला आहे.

महिला लोकशाही दिनामध्ये अर्ज करण्यात महिलांनी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाकरिता करावयाचे विहित नमुन्यातील अर्ज संबधितांनी द्विप्रतीत करणे आवश्यक आहे. तक्रार अर्ज/ निवेदन हे वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे.

कृष्णा नदीचे पाणी अडवल्याने अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार

कोरेगाव : कृष्णा नदीतून पावसाळ्यातील चार महिन्यात म्हणजेच जून ते सप्टेंबर या कालावधीत पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी जिहे -काटापूर येथे कृष्णा नदीवर बंधारा बांधून ते पाणी तीन टप्प्यांमध्ये उचलून खटाव व मान तालुक्यात देण्याचे नियोजन असून, इतर वेळी कृष्णा नदीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत चालू ठेवायचा असा शासन निर्णय असूनही त्याचे पालन न केल्याने धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने चार अधिकाऱ्याविरुद्ध पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली आहे. समितीच्या या कृतीमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे (पुणे) कार्यकारी अभियंता मी दे कुलकर्णी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे (कृष्णानगर सातारा)अधीक्षक अभियंता जयंत शिंदे, जीहे -कटापूर उपसा सिंचन योजनेचे (सातारा) कार्यकारी अभियंता अमोल निकम यांच्यावर खाजगी फौजदारी दाखल करावी अशी मागणी धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीच्या नऊ पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक, कोरेगावचे पोलीस उपअधीक्षक, कोरेगाव आणि रहिमतपूर पोलीस ठाण्यातील ठाणे अंमलदारांकडे आज केली आहे.

समिती पदाधिकाऱ्यांनी तक्रारीत म्हटले आहे,की कृष्ण नदीवर जिहे -कटापूर गावच्या हद्यांमध्ये बंधारा बांधून पाणी अडवले आहे. मूळ योजनेनुसार या ठिकाणाहून पावसाळ्यातील जून ते सप्टेंबर या कालावधीत कृष्णा नदीतून पाणी उचलून ते नेर तलावातव तेथून पुढे आंधळी तलावात, त्याखालील कोल्हापूर पद्धतीच्या बंधार्यांमध्ये नेण्याचे नियोजन आहे.तसेच हा विहित कालावधी वगळता वर्षातील इतर महिन्यात कृष्णा नदीच्या नैसर्गिक नदी प्रवाह सुरळीत ठेवायचा आहे.तो अडवण्याचा अथवा बंद करावयाचा नाही; परंतु वर नमूद केलेल्या चार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे कृष्णा नदीचे पाणी जिहे- कटापुर योजनेच्या बंधार्यापासून खाली सोडणे बंद केले आहे.

हाल ही में शाहरुख खान से मिला और उन्होंने कहा कि उन्हें द रेलवे मैन बहुत पसंद आया है!' : शिव रवैल

यशराज फिल्म्स के घरेलू, नवोदित निर्देशक शिव रवैल इस बात से बहुत खुश हैं कि उनके आदर्श शाहरुख खान ने उनका प्रोजेक्ट, वाईआरएफ की वैश्विक हिट सीरीज, द रेलवे मैन देखा है और इसे पसंद भी किया है!

नेटफ्लिक्स और वाईआरएफ एंटरटेनमेंट की टेंटपोल सीरीज़, द रेलवे मैन, वीरता, आशा और मानवता की एक रोमांचक कहानी है जो राष्ट्रीय और अंतरराष्ट्रीय स्तर पर बहुत हिट है। १८ नवंबर को प्रीमियर हुई ४-भाग वाली मिनी-सीरीज़, दुनिया भर के मीडिया और दर्शकों से सर्वसम्मति से सकारात्मक समीक्षाओं के आधार पर एक बड़ी सफलता की कहानी है! वास्तव में, द रेलवे मैन अब लगभग तीन महीनों से वैश्विक चार्ट में शीर्ष पर है!

निर्देशक शिव रवैल, एक निर्देशक जिसे वाईआरएफ ने सीरीज के साथ लॉन्च किया है, शाहरुख खान को उनके काम और वाईआरएफ प्रोजेक्ट के लिए मिली प्रतिक्रिया के साथ बहुत खुश है.

वह कहते हैं, मुझे अब तक सराहना का सबसे अच्छा संदेश मेरे सिनेमाई आइकन शाहरुख सर से मिला है! शाहरुख खान और मैं हाल ही में मिले और उन्होंने कहा कि उन्हें सीरीज बहुत पसंद आया है। इंडस्ट्री ने बहुत प्यार दिखाया है और आप जानते हैं कि एक नवोदित निर्देशक के लिए - मुझे लगता है कि यह पहचान हासिल करना अद्भुत है। आप इसके बारे में वास्तव में अच्छा महसूस करते हैं, खासकर जब आपके सहकर्मी, आपके समकालीन और जिन लोगों को आपने देखा है वे आपसे इस पर चर्चा करते हैं।

शिव कहते हैं, मैंने फैन के एक विज्ञापन के लिए शाहरुख सर के साथ काम किया है - आप उनसे सुनकर जानते हैं कि उन्हें वास्तव में यह पसंद है और इंडस्ट्री के अन्य निर्देशकों से फोन आते हैं जिनकी फिल्में आपने वर्षों से देखी और पसंद की हैं, यह बस है अद्भुत लगता है!

शिव रवैल को उस प्यार और सराहना के बारे में बात करते हुए देखें जो द रेलवे मैन को अभी भी दुनिया भर से मिल रही है और इस शो को अपने पहले प्रोजेक्ट के रूप में निर्देशित करने के उनके फैसले के बारे में एक नए वीडियो में देखें जिसे आज धठ्ऋ द्वारा जारी किया गया है: https://youtu.be/dUB8PšBDVFQ

द रेलवे मैन वीरता, आशा और मानवता की एक रोमांचक कहानी है! यह नेटफ्लिक्स और वाईआरएफ एंटरटेनमेंट के बीच पहली साझेदारी है। यह भोपाल गैस त्रासदी की भयावह रात में भोपाल में भारतीय रेलवे के कर्मचारियों द्वारा प्रदर्शित असाधारण वीरता की कहानी है! ये आत्म-बलिदान करने वाले व्यक्ति सभी बाधाओं के खिलाफ खड़े हुए और हवा में एक अदृश्य दुश्मन से लड़ते हुए साथी नागरिकों को बचाने के लिए अपनी जान जोखिम में डाल दी।

सच्ची कहानियों से प्रेरित, इस मनोरंजक सीरीज में आर माधवन, के के मेनन, दिव्येंदु, बाबिल खान, जूही चावला और मंदिरा बेदी सहित कई शानदार कलाकार शामिल हैं।

मनोज जरांगेंच्या समर्थनार्थ छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर रास्तारोको; वाहतूक ठप्प

फुलंब्री : छत्रपती संभाजीनगर ते जळगाव या राष्ट्रीय महामार्गावरील आळंद गावाजवळ आज सकाळी ११ वाजेपासून मनोज जरांगे यांच्या समर्थनात रास्तारोको आंदोलन सुरू करण्यात आले आहे. यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली असून शेकडो वाहने अडकली आहेत.मराठा आरक्षणासाठीमनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आहे.

आज उपोषणाचा सहावा दिवस असून जरांगे यांची प्रकृती खालावत जात असल्याने मराठा समाज आक्रमक झाला आहे. आज सकाळी अकरा वाजता फुलंब्री तालुक्यातील आळंद गावाजवळ छत्रपती संभाजीनगर ते जळगाव महामार्ग बंद केला. आंदोलक रस्त्यावर बसून आंदोलन करत असून मनोज जरांगे यांच्या समर्थानात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे.एक मराठा, लाख मराठा, मनोज जरांगे तुम आगे बडो, हम तुम्हारे साथ है, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला आहे. या रास्तारोकोमुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली असून दोन्ही बाजूंनी शेकडो वाहने अडकून पडली आहेत. दरम्यान, वडोद बाजार पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

बाणेर,बालेवाडी मुळा नदी आणि राम नदी जलपर्णी तसेच कचरा मुळे रोगराईत वाढ

बाणेर ,बालेवाडी : बाणेर तसेच बालेवाडी मधून वाहणारी मुळा नदी आणि राम नदी मधील जलपर्णी तसेच घरातील कचरा नदी पात्रात टाकण्याच्या प्रकारा मुळे डासांचे प्रमात वाढ झाली आहे जागो जागी नदी प्रदूशित होत असतांनाही यावर मनपा कोणत्याही कारवाई करत नाही घरोघरी कचरा उचलणारे मनपाचे स्वयंसेवक पैसे मागतात अशी जनतेची अडचण मग हे कचरा नदी पात्रात टाकता अशी येथिल जनतेची तक्रार आहे यावर मनपाने तातडीने उपाय करण्याची गरज आहे

बाणेर,बालेवाडी येथून वाहणारी मुळा आणि राम नदी जलपर्णी वाढण्याचे प्रकार तसेच जनता नदीपात्रात कचरा टाकत असल्या कारणाने प्रदूशनात वाढ होत आहे

जागो जागी डासांचे प्रमाणात वाढ, रोगराईत वाढ होण्याच प्रकार वाढत आहेकचरा आणि जलपर्णी डासांचे पैदासाचे केंद्र ठरत आहे या कारणाने मलेरिया सारखे किटकजन्य आजाराचे रूग्ण या विभागात वाढत आहे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे दर वेळी मनपा जलपर्णी आणि कचरा ऊचलण्या करिता लाखोचा खर्च करते मग प्रश्न पूढे येतो जलपर्णी आणि कचरा नदी पात्रात कसा राहतो काही दिवसाने जैसे ती स्थिती नदीची होत आहे बालेवाडी,बाणेर नदीचा प्रवाह स्थिर आहे अनेक ठिकाणी सांडपाणी थेट नदी पात्रात सोडण्याचा प्रकार राजेरोस पणे होतो या सांडपाण्या मुळे दुर्गंधी सूटत आहे राम नदी विधाते वस्ती जवळून वाहते या वस्ती मधील नदीपात्रात कचरा टाकण्याचा प्रकार होतो नदीतील प्रदूषणात वाढ होत आहे या बाबत अनेक तक्रारी करूनही यावर मनपा कडून ऊपाय योजना केली जात नाही कचरा नदी पत्रात जनता टाकते याचा प्रकारही वेगळाच आहे लहान लहान व्यवसाईक, छोटे कूटूंबा कडून कचरा ऊचलण्याच्या नावा खाली कचरा ऊचलणारे स्वयंमसेवका कडून पैश्याची मागणी केली जाते या कारणाने नागरिक कचरा नदी पात्रात टाकतात किंवा रस्त्याच्या कडेला टाकतात हा प्रकार राम नदी,मुळा नदी जवळ घडतांना दिसतो मनपा काही दिवस ऊपाय योजना करते पण पंधरा दिवसा नंतर जैसे ती स्थिती होतेया कारणाने डासांचे प्रमात वाढ होणे,आरोग्य समस्यात वाढ होण्याचा प्रकार यावर आळा घालण्याची मागणी आणि प्रतिबंधक ऊपाय करण्याची मागणी येथिल जनते कडून होत आहे.

> विधातवस्ती मधील सर्व नागरिकांना स्वच्छता स्वयंसेवका कडे कचरा देण्याचे सांगण्यात आले आहे नदी पात्रात किंवा नदी जवळ कचरा टाकू नये म्हणून ताकीद दिले असले तरी कचरा टाकण्यात येतो कचरा ऊचलणारे स्वयंमसेवक जर पैसे मागणी करत असतील तर तक्रार दाखल केल्या नंतर कारवाई केली जाईल तसेच मुळा नदी जवळ सुध्दा असाच प्रकार आहे जलपर्णीत वाढ होण्याच्या प्रकारावर ऊपाय योजना करण्यातयेईल जलपर्णी तातडीने ऊपाय योजना करून काढण्यात येईल -जया सांगडे आरोग्य निरीक्षक औध

> राम नदीपात्रात कचरा टाकल्यामुळे पाणी प्रदूशित होत आहे यात भर पडते ती नदीत जलपर्णी वाढण्याचे प्रकारामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे
> याचा ऊपाय योजना म्हणून जयेश सोशल फाऊंडेशन, मनपा आणि स्थानिक जनतेच्या माध्यमातून कचराआणि साफसफाई करण्यात आली होती परंतू पंधरा दिवसा नंतर परत हाच प्रकार वाढला याचे मुळ कारण म्हणजे कचरा उचलणारे प्रत्येक घरा कडून कचरा उचलण्या करिता पैसे मागतात ,लहान लहान व्यवसाईकाकडून पैसे मागतात यामुळे येथिल जनता नदी पात्रात किंवा कडेला कचरा टाकतात यावर मनपाने कायमस्वरूपी ऊपाय योजना करवी
> - जयेश मुरकुटे सोशल फाऊंडेशन बाणेर

> बाणेर बालेवाडी मुळा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात कचरा, जलपर्णीचा प्रादुर्भाव वाढल्या करणाने अनेक जलपर्णी डासांचे पैदास केंद्र ठरत आहे लवकरात लवकर जलपर्णी काढण्या करिता मनपाने तातडीने पावले उचण्याची गरज आहे कायमस्वरूपी ऊपाय योजनाकरण्याची मागणी करण्यात आली आहे लहू बालवडकर चिटणिस भाजप पुणे शहर

आमदार अतुल बेनके यांचे राज्यमंत्री अदिती तटकरे आमदार रोहित पवार आमदार अमोल मिटकरी यांनी केले सांत्वन

नारायणगाव : राज्याच्या महिला व बालकल्याण राज्यमंत्री अदिती तटकरे , राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे नातू व कर्जत जामखेड चे आमदार रोहित पवार विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी हडपसरचे आमदार सुनील टिंगरे यांनी आज आमदार अतुल बेनके व त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले

कृष्णा खोरे विकास महामंडळाचे माजी उपाध्यक्ष व जुन्नर तालुक्याचे माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या निधनानंतर आज आमदार अतुल बेनके यांचे सांत्वन करण्यासाठी नारायणगाव येथे त्यांच्या निवासस्थानी वरील मान्यवरांनी भेट दिली. याप्रसंगी श्रीमती राजश्री बेनके डॉक्टर अमोल बेनके उद्योजक अमित बेनके व कुटुंबीयांचे त्यांनी आस्थेने चौकशी करून सांत्वन केले या प्रसंगी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक कार्याध्यक्ष रविकांत वर्पे, सरचिटणीस सौरभ काळे, सचिव सुरज वाजगे, जिल्हा कार्याध्यक्ष अनंतराव चौगुले, तालुकाध्यक्ष तुषार पवार, जिल्हा परिषद माजी सदस्य मोहीत ढमाले, दिलीप कोल्हे, स्वप्निल गायकवाड, विजय कुन्हाडे, रोहिदास केदारी, संदीप वरपे अजित लेंडे, प्रणव संते आदी मान्यवर उपस्थित होते.

मनपा अतिक्रमण अधिका-यास हडपसर क्षेत्रीय कार्यालयात जाऊन मारहाण

हडपसर : हडपसर भागात सध्या गुन्हेगारी वाढलेली असून ठिकठिकाणी मारामारी,वाहानांची,कार्यालय तोडफोड, चो-या,लुटीचा प्रकार अनेकदा घडताना दिसत आहे हडपसर मध्ये कायदा सुव्यवस्था अबाधित राहिला का नाही अशी चर्चा नागरीकांमध्ये सुरु आहे.

नागरीक आता थेट प्रशासकीय कार्यालयात जाऊन अधिका-यास मारण्याची हिंमत नागरिक करीत आहेत.

महापालिका हडपसर क्षेत्रीय कार्यालय अतिक्रमण अधिकारी धम्मानंद गायकवाड यांना हडपसर क्षेत्रीय कार्यालयात जाऊन एका व्यक्तीने दमदाटी, शिवीगाळ करीत अंगावरील कपडे फाडत मारहाण

कार्यालयाची केली तोडफोड

केली.मारहाण करणारी व्यक्तीचे नाव ख्रिस्तोफर जॉन नाईक वय २६ रा.गोपाळपट्टी मांजरी बुद्रुक हडपसर असे आहे.

ख्रिस्तोफर यांचे हडपसर मधील सोलापूर रोड वर मेन रस्त्यावर सावली फाउंडेशन जवळ. गोरीला ग्लास रस्त्यावर उभे राहून विक्री करण्याचा व्यवसाय आहे , रस्त्याला अडथळा ठरतील असे अतिक्रमण केलेले होते.ते अतिक्रमण अतिक्रमण निरीक्षक धम्मानंद गायकवाड यांच्या आदेशानुसार अतिक्रमण कर्मचारी यांनी काढल्यानंतर ते का काढता याचा मनात राग धरून फोनवर. शिवीगाळ केलेली होती.पुढे कारवाई करतील या उद्देशातून ख्रिस्तोफर त्यांनी गायकवाड यांना फोन केला की मला तुम्हाला भेटून माफी मागायची म्हणून हडपसर मधील मनपा क्षेत्रीय कार्यालयात बुधवारी दुपारी अडीजतीनच्या सुमारास आला .आल्यानंतर धम्मानंद गायकवाड यांना सारखे कारवाई का करतो म्हणून बायका मुलावरुन अश्लील भाषेत शिवीगाळ, दमदाटी करीत अंगावरील कपडे फाडत मारहाण करण्यास सुरवात केली. तसेच ऑफिस कॅबिनची काचा तोडफोड केली, फाईली फेकुन जोरजोराने आरडाओरड करून मारहाण करीत राडा केला.यावेळी मनपाचा स्टाफ उपस्थित होता. मनपा अतिक्रमण अधिकारी धम्मानंद गायकवाड यांनी हडपसर पोलीस स्टेशन मध्ये मारहाण करणा-या विरुद्ध रितसर तक्रार दाखल केली असून सरकारी कामात हस्तक्षेप करणे , शिवीगाळ , मारहाण आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास हडपसर पोलीस करीत आहेत.

> हडपसर भागात अनेक ठिकाणी रस्त्यावर उड्डाणपूलाखाली विविध ठिकाणी विविध विक्रेते, भाजी विक्रेते , टेम्पो हातगाडी, बैठे स्टॉल आदींनी अतिक्रमण केलेले असून याचा वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत. अनेकदा कारवाई करुन देखील नागरिक रस्त्यावर पुन्हा व्यवसाय करतात , कारवाई केली की , त्या त्या संघटनेचे नेते येतात कारवाई का करता असे म्हणत दबाव आणतात, अनेकदा रोषाला सामोरे जावे लागते, आमच्याकडे पुरेसा स्टाफ नाही त्यामुळे जास्ती कारवाई करता येत नाही, आमच्यावर हल्ले होतात, पुरेसे स्टाफ,कर्मचारी मिळावे, पोलीस संरक्षण मिळावे,
> - धम्मानंद गायकवाड
> अतिक्रमण अधिकारी, हडपसर क्षेत्रीय कार्यालय पुणे

सर्वोच्च न्यायालयात निश्चित न्याय मिळेल : सुप्रिया सुळे

बारामती : विधानसभा अध्यक्षांनी दिलेला निर्णय हा आमच्यासाठी अपेक्षितच होता, आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असून न्यायालय याबाबत योग्य तो निर्णय घेईल, अशी अपेक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. बारामतीत त्या माध्यमांशी बोलत होत्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेस पक्षात विलीन होणार अशा बातम्या येत असल्याबद्दल विचारले असता त्या म्हणाल्या की, तुम्हाला तुमच्या माध्यमांची विश्वासार्हता जपायची असेल तर खात्री करूनच अशा प्रकारच्या बातम्या द्या, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार यात कसलेही तथ्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

विविध समाजाच्या आरक्षणाच्या संदर्भात राज्य शासन असंवेदनशील आहे, मी स्वतः अनेकदा संसदेत याबाबत आवाज उठवला आहे, मात्र राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारची ठोस कृती केली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. २०० आमदार व ३०० खासदार असलेल्या सरकारला आरक्षणाबाबत निर्णय घेणे अवघड नाही, असेही त्या म्हणाल्या.

मनोज जरांगे पाटील यांनी खूप सहनशीलता दाखवली आहे , त्यांनी अनेकदा सरकारचं म्हणणं ऐकून आंदोलन मागे घेतले पण सरकार याबाबत काहीही करायला तयार नाही. आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने सर्वांचीच फसवणूक केली आहे. ज्या काँग्रेसने अशोक चव्हाण यांना भरभरून दिलं त्यांनी आज वेगळा विचार केला आहे, भाजपला देखील नवीन नेतृत्वाची आता गरज भासू लागली असल्याची टीका त्यांनी केली.

पुढील पाच वर्ष जे नेते मेहनत करतील तेच नेते या राज्यातील जनतेच्या मनावर पुढील २५ वर्ष राज्य करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मी खासदार म्हणून काम करत असल्यापासून गेल्या अठरा वर्षात कधीही माझ्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही किंवा मी कधीही कोणतेही कॉन्ट्रॅक्ट घेतले नाही किंवा माझा नवरा देखील कधीही बारामतीत फार येत नाही. आम्ही कोणीही कसल्याही भानगडीत पडत नाही, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. जनतेचे प्रश्न सोडवणे हेच माझे समाजकारण व राजकारण आहे.

भाजपमध्ये काम करणारे मूळचे निष्ठावान नेते आज कोठे आहेत, असा सवाल करत सत्ता येऊनही त्यांना कुठे स्थान मिळत नाही ते कायमच विरोधातच दिसतात अशी टीका त्यांनी भाजपवर बोलताना केली.

पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनाकडे पाठपुरावा करणार : खा. श्री. छ. उदयनराजे भोसले

सातारा : राज्यात निर्भीड व सडेतोड पत्रकारिता करत असताना पत्रकारांवर भ्याड हल्ले होत आहेत. पत्रकारांच्या संरक्षणासाठी पत्रकार हल्लाविरोधी कायदा आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नाही, असे मला आत्ताच मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी सांगितले आहे. याबाबत मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करू, असे अभिवचन खा. श्री. छ. उदयनराजे भोसले यांनी सातारा येथे केले आहे. दरम्यान, सातारा जिल्ह्यातील पत्रकारांच्या मेडिक्लेम संदर्भात जिल्हा पत्रकार संघासमवेत चर्चा करून लवकरच धोरणात्मक निर्णय घेवू, अशी ही ग्वाही त्यांनी दिली.

सातारा जिल्हा पत्रकार भवनाचे फटाक्यांच्या आतषबाजीत, हलगी तुतारीच्या निनादात जल्लोषात व धूमधडाक्यात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या हस्ते उद्घाघाटन झाले.

गोडोली येथे उभारण्यात आलेल्या सातारा जिल्हा पत्रकार भवनाच्या उद्घाटन सोहळ्यात खा. उदयनराजे बोलत होते. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा पोलिस प्रमुख समीर शेख, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, माजी उपनगराध्यक्ष ॲड. डी. जी. बनकर, मनोज शेंडे, टी.व्ही जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष विनोद जगदाळे, परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, राज्य उपाध्यक्ष शरद काटकर, पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष व सातारा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीष पाटणे, सातारा पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे पुणे

विभागीय सचिव गणेश मोकाशी, मुख्याधिकारी अभिजीत बापट, नगर अभियंता दिलीप चिद्रे, डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे, सांजवात संपादक घनश्याम छाबडा, माधव जाधव,अजित जगताप, विशाल कदम, संदीप शिंदे, निखिल मोरे, कैलास मायणे,अरुण जावळे, संजय शिंदे, शशिकांत पाटील, मनोज पवार, दत्ता पवार, शहाजी गुजर व मान्यवर पत्रकार मंडळी उपस्थित होते.

खा. उदयनराजे भोसले म्हणाले, माझ्या राजकीय वाटचालीत सातारा जिल्ह्यातील पत्रकारांची खूप मोठे योगदान दिले आहे .त्यामुळेच पत्रकार भवनासाठी हरिष पाटणे, विनोद कुलकर्णी यांचा आग्रह झाल्यावर मी तो मोडू शकलो नाही. कारण मी त्यांच्याकडे मित्र म्हणून पाहतो. हे पत्रकार भवन साकारताना ॲड. डी. जी. बनकर, मनोज शेंडे, मुख्याधिकारी अभिजीत बापट, सुशांत मोरे, दिलीप चिद्रे यांनी जे परिश्रम घेतले आहेत ते कौतुकास्पद आहेत. सातारचे हे पत्रकार माझे एवढे मित्र आहेत की पत्रकारांचा प्रश्न मार्गी लावला नाही तर त्यांच्या तावडीतून सुटका होणार नाही, अशी मिश्किलीही उदयनराजेंनी केली.

सातारा जिल्ह्यातील पत्रकारांचे व माझे वेगळे नाते आहे. त्यामुळे त्यांचा मेडिक्लेम करण्यासाठी सातारा जिल्हा पत्रकार संघासमवेत चर्चा करून आम्ही सर्वजण बसून धोरणात्मक निर्णय घेवू. मी माझ्या मित्रांकडे पत्रकार म्हणून पाहत नाही. आमचा एक ग्रुप आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी करावे लागेल, असेही उदयनराजे म्हणाले.

हरिष पाटणे यांची पत्रकारांसाठीची तळमळ मी खूप जवळून पाहिली आहे. हरिष पाटणे संघटनेच्या पदावरून आता बाजूला होतो असे म्हणाले आहेत. मात्र, ते फार हुशार आहेत, ते फॉर्म भरण्याच्या तयारीत असू शकतात. त्यामुळे मी त्यांना पदावरून खालीच उतरू देणार नाही, त्यामागे माझाही स्वार्थ आहे असा मिश्किल चिमटाही उदयनराजेंनी काढला.

एस. एम. देशमुख म्हणाले, राज्यात मराठी पत्रकार परिषदेच्या नेतृत्वाखाली पत्रकार एकत्र आले आहेत. पत्रकारांवर होणारे हल्ले ही चिंतेची बाब आहे. पत्रकार हल्ला विरोधी कायदा झाला पण त्याची अंमलबजावणी होण्यासाठी नोटिफिकेशन निघाले नाही. यामध्ये पत्रकारांची फसवणूक झाली. कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी तीव्र लढा उभा करणार आहे. खा. उदयनराजे भोसले यांनी पत्रकार हल्लाविरोधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी पत्रकारांचे नेतृत्व करावे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करावा. सातारा जिल्ह्यातील पत्रकारांचे मेडिक्लेम निघाले तर राज्यातील उर्वरित जिल्ह्यांसमोर हा आदर्श जाईल आणि तो आदर्श उदयनराजेंनी घालून द्यावा, असे ही आवाहनही त्यांनी केले.

सातारा जिल्हा पत्रकार संघाने पत्रकारांसाठी विविध व नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून इतर जिल्ह्यांसमोर आदर्श उभा केला आहे. महाराष्ट्रातला हा आदर्श जिल्हा पत्रकार संघ आहे. सातारा जिल्हा पत्रकार भवनाच्या उभारणीत योगदान दिल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने राज्यातील तमाम पत्रकारांतर्फे एस. एम. देशमुख यांनी खा. श्री. छ. उदयनराजे भोसले यांचे जाहीर आभार मानले.

किरण नाईक म्हणाले, सातारा जिल्हा पत्रकार संघाने हरीष पाटणे यांच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ठ काम केले आहे. सातारा जिल्हा पत्रकार संघाने दिवंगत पत्रकारांना केलेली आर्थिक मदत हा राज्यातील इतर जिल्ह्यांसमोर आदर्श आहे. इतर जिल्ह्यांनीही सातार्यासारखे उपक्रम राबवायला हवेत, असे सांगितले.

हरीष पाटणे म्हणाले, सातारा जिल्ह्याच्या क्रांतिकारी पत्रकारितेचा आजचा दिवस स्वप्नपूर्तीचा सोहळा आहे. खा. उदयनराजे भोसले हे या संकल्पपूर्तीचे जनक आहेत. एस. एम. देशमुख, किरण नाईक यांनी जिल्हा पत्रकार संघाची जबाबदारी आमच्यावर सोपवल्यानंतर आम्ही मित्रांनी एकत्रितपणे जिल्हा पत्रकार संघाच्या माध्यमातून अनेक धाडसी उपक्रम राबवले. मात्र सातारा जिल्ह्याचे हक्काचे पत्रकार भवन नव्हते. खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, ॲड. डी. जी. बनकर, मनोज शेंडे, अभिजीत बापट, दिलीप चिद्रे, सुशांत मोरे, विनोद कुलकर्णी या सर्वांनी मिळून माझ्या कारकिर्दीतील स्वप्नपूर्ती केली हे मी कधीच विसरणार नाही. विशेषत: उदयनराजे भोसले हे शब्दाला जागणारे राजे आहेत त्यांचा सातारा जिल्ह्यातील तमाम पत्रकारांच्यावतीने मी आभारी राहीन. जिल्ह्यातील पत्रकारितेने माझ्यावर भरभरून प्रेम केले. या पत्रकारितेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी जिल्हा पत्रकार भवनाचे स्वप्न पाहिले होते. त्याची स्वप्नपूर्ती झाल्याने आता सातारा जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याची माझी इच्छा आहे,

राहुल आणि प्रियंका गांधी या मतदारसंघातून लढवणार लोकसभा निवडणूक

UP-बिहारमधील ४० जागांवर काँग्रेसचा दावा

लोकसभा निवडणुकीसाठी उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये इंडिया आघाडीमध्ये होणाऱ्या जागावाटपाला आता नवं वळण लागण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारमधील किमान ३० ते ४० जागांवर काँग्रेसकडून दावेदारी ठोकण्यात आली आहे. तसेच राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचे मतदारसंघही काँग्रेसकडून निश्चित करण्यात आले आहेत. राहुल गांधी रायबरेली येथून तर प्रियंका गांधी अमेठी येथून स्मृती इराणी यांच्या विरोधात निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. येत्या एक दोन दिवसांमध्याबाबतची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बिहारमधील सुमारे १५ ते २० जागांवर काँग्रेसकडून महाआघाडीमध्ये दावेदारी करण्यात आली आहे. या जागांवर तारिक अन्वर, अखिलेश प्रसाद सिंह, कन्हैया कुमार, शकील अहमद खान आणि राज्यसभा खासदार रंजीत रंजन या नेत्यांना लढवलं जाण्याची शक्यता आहे.

इंडिया आघाडीतील बदलत्या समिकरणांदरम्यान, उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेस नेत्यांनी जागावाटपाबाबत नव्याने चर्चा सुरू केली आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये अनुक्रमे आरएलडी आणि जेडीयूने साथ सोडल्यानंतर कांग्रेसला अधिका जागा मिळाल्या पाहिजेत, असा काँग्रेस नेत्यांचा आग्रह आहे. दरम्यान, काँग्रेसने समाजवादी पक्षाकडे आपल्या २० उमेदवारांच्या नावांची यादी सोपवली आहे, असे काँग्रेसच्या एका नेत्याने सांगितले.

काँग्रेसने उत्तर प्रदेशमधील अमेठी, राय बरेली, कानपूर, बलिया, बाराबंकी, मेरठ, महाराजगंज, रामपूर, सहारनपूर, झाशी, फतेहपूर सिक्री, जालौन, बासगांव आणि बिजनौरसारख्या जागांवर दावा केला आहे. जागावाटपाबाबत राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्यामध्ये चर्चा सुरू आहे. सध्या केवळ ५ ते ६ जागांवरच सहमती बनली आहे. मात्र काँग्रेस आणि सपामध्ये १५ ते २० जागांवर एकमत होईल, असं बोललं जात आहे.

त्याचप्रमाणे भाजपाने

बिहारमध्येही १५ ते २० जागांवर दावेदारी केली आहे. काँग्रेसकडून सुपौल, सासाराम, समस्तीपूर, मधुबनी, दरभंगा, बेगुसराय, पूर्ण चंपारण्य, पटना साहिब, झंझारपूर, किशनगंज, औरंगाबाद, गोपालगंज, कटिहार आमि अररिया या जागांसाठी काँग्रेस आणि आरजेडीमध्ये चर्चा सुरू आहे.